मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत
राज्यातील निवडलेल्या रस्त्यांची दर्जोन्नती
आशियाई विकास बँकेच्या (A.D.B.)
कर्जसहाय्याने करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मुग्रायो २०१९/ प्र.क्र.२२७ (अ) / बांध-४
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: ८ मार्च, २०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात एकुण २,३६,००० कि.मी. लांबीचे ग्रामीण मार्ग व इतर जिल्हामार्ग यांचे जाळे पसरले आहे. ग्रामीण भागातील न जोडलेल्या वाडया, वस्त्या जोडण्यासाठी व दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती (सुधारणा) करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना सुरू करण्याचा शासन निर्णय दि. २८.१०.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेमध्ये सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या पाच वर्षाच्या कालावधीत एकुण ३०,००० लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या रस्त्यांची दुरावस्था सुधारण्याची निकड लक्षात घेता तातडीने रस्ते दर्जोन्नती करणे आवश्यक आहे. रस्ते दर्जोन्नतीमुळे ग्रामीण भागातील लोकांचे जिवनमान उंचावण्यास मदत होणार असून याकरीता आवश्यक असलेल्या निधीची गरज लक्षात घेता सन २०१९-२० या वर्षातील उद्दिष्टातील साधारणपणे ६३०० कि.मी. लांबीच्या कामाकरीता आशियाई विकास बँकेकडुन एकुण ५०० मिलीयन यु.एस. डॉलर इतके कर्ज घेण्याचे प्रस्तावीत आहे. याकरीता आशियाई विकास

बँकेच्या Fact-Finding Mission ने फेब्रुवारी २०१९ मध्ये ग्रामविकास विभागातील अधिकाऱ्यांशी तपशिलवार चर्चा केली असून त्यानुसार केंद्र सरकारच्या वित्त विभागातील DEA च्या मान्यतेने Aide Memoire राज्य शासनाच्या मान्यतेसाठी प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने दि.२७.०२.२०१९ रोजी राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत महत्वपुर्ण चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

ग्रामीण रस्त्याची दर्जोन्नती व सुधारणा करण्याकरीता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या सन २०१९-२० च्या उद्दिष्टातील साधारणपणे ६३०० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या दर्जोन्नतीसाठी आशियाई विकास बँकेचे ५०० मिलीयन यु.एस. डॉलरचे कर्ज घेण्यास तत्वत: मान्यता दर्शविण्यात येत असून त्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) आशियाई विकास बँकेकडुन प्राप्त होणारे ५०० मिलियन यु.एस. डॉलरच्या कर्जाची दोन टप्यात विभागणी करण्यात आली असल्याने प्रथम टप्यात २०० मिलियन यु.एस. डॉलरच्या कर्जातून २१५२ कि.मी लांबीच्या रस्त्याची दर्जोन्नती करण्यास व दुसऱ्या टप्यात ३०० मिलियन यु.एस डॉलरच्या कर्जातून अंदाजे ४१४८ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्यास मान्यता दर्शविण्यात येत आहे.

२) आशियाई विकास बँकेकडून प्राप्त होणारे कर्ज प्रतिपुर्ति स्वरूपाचे असल्याने मुद्दल आणि कर्जाच्या व्याजाच्या परतफेडीसाठी राज्य अर्थसंकल्पात आवश्यकतेनूसार तरतूद करण्यास मान्यता दर्शविण्यात येत आहे.

३) आशियाई विकास बँकेकडुन प्राप्त होणाऱ्या कर्जाचे व्याज हे LIBOR RATE आधारित असल्याने LIBOR RATE मध्ये होणाऱ्या बदलाच्या अनुषंगाने कर्ज परतफेडीसाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पीय तरतुदीतून उपलब्ध करण्यास मान्यता दर्शविण्यात येत आहे.

४) कर्जाची परतफेड ५ वर्षाच्या ग्रेस पिरिएड सह एकुण २५ वर्षात दरवर्षी अर्थसकंल्प तरतुदीतून करण्यात यावी.

५) आशियाई विकास बँकेकडुन उपलब्ध होणाऱ्या ५०० मिलियन यु.एस. डॉलरची कामे Advance Contracting द्वारे करण्यास आशियाई विकास बँकेने मान्यता दर्शविली असल्याने Fact Finding Mission च्या Aide Memoire मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता दर्शविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८११३२३८३८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE

Digitally signed by RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, postalCode=400001, street=RURAL DEVELOPMENT DEPT,BANDHKAM BHAVAN,25MARZBAN ROAD,FORT,MUMBAI, serialNumber=d404eac17c41303f055a321c8b78aa06691d96f89d2b59532f46b0d468148ae1, ou=RURAL DEVELOPMENT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAGHUNATH ANNASAHEB NAGARGOJE
Date: 2019.03.08 14:53:38 +05'30'

(र.आ.नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्ष नेता (विधान परिषद/ विधान सभा)
२. अ.मु.स. (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई
३. अ.मु.स. (नियोजन विभाग), मंत्रालय, मुंबई
४. सचिव (मु.मं.ग्रा.स.यो.) ,ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
५. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो., पुणे
७. सर्व अधिक्षक अभियंता, (प्र.मं.ग्रा.स.यो.), म.ग्रा.र.वि.संस्था
८. उप सचिव (मु.मं.ग्रा.स.यो.), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
९. वित्तीय नियंत्रक (प्र.मं.ग्रा.स.यो.), ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई
१०.निवडनस्ती (बांध-४). ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई